दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ७७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१० जून २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## टायर फुटून झालेल्या अपघातात तिघे जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळ एका वाहनाचे टायर फुटून झालेल्या अपघातात गाडीतील तिघे जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

आज सकाळी ०९ .१० वाजता चे सुमारास पनवेल जवळील पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर मुंबई लेनवर कि.मी.१३. २०० येथे कार क्रमांक MH 02CB- 6095 या गाडीचा पाठीमागील डाव्या बाजूचा टायर फुटून गाडी पलटी होऊन अपघात झाला सदर अपघातामध्ये कनक पंच आलिया (वय-३७) राहणार परेल मुंबई, स्वाती (वय-३५), अनु (वय-३४) हे किरकोळ जखमी झाले आहेत.



# १० व ११ जून दोन दिवस रायगडसाठी धोकादायक

## अतिवृष्टीचा इशारा ; नागरिकांनी सतर्क राहण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोकणातील जिल्ह्यांमध्ये ९ ते १२ जून या कालावधीत अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाच्या इशार्यानुसार, रायगड जिल्ह्यात १० आणि ११ जूनला अतिमुसळधार पाऊस होण्याची शक्यता असून ताशी १२ ते २० किमी वेगाने वारे वाहण्याचे संकेत मिळाले आहेत. त्यामुळे हे दोन दिवस रायगडकरांसाठी धोकादायक असून, नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी केले आहेत.

अतिवृष्टीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने सर्व यंत्रणांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. जिल्ह्यात काल (८ जून) पासूनच जोरदार पावसाने सुरुवात केली आहे. आजही काही भागात जोरदार तर काही ठिकाणी रिमझिम पाऊस सुरुच आहे. गेल्या चोवीस तासांत जिल्ह्यात ५८.९९ मि.मी. च्या सरासरीने एकूण ९४३.८० मि.मी. पावसाची नोंद झाली आहे.

अतिवृष्टी आणि भरतीमुळे समुद्र, खाडी भागात किनाऱ्याला समुद्राचे पाणी बाहेर येण्याची शक्यता असते. समुद्र, खाडी किनारी गावात पाणी शिरुन पूरस्थिती निर्माण होऊ शकते. त्या दृष्टीने नागरिकांनी सतर्क रहावे, अशा सूचना जिल्हा प्रशासनाने दिल्या आहेत. तसेच आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास, अशा वेळी नागरिकांना तात्काळ सुरक्षित स्थळी




हलविण्याचे निर्देश स्थानिक प्रशासनाला देण्यात आले आहेत.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन किंवा स्थानिक प्रशासनाकडे तात्काळ मदत मागावी, असेही आवाहन जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी केले आहे.

### जिल्ह्यातील १०३ गावे दरडग्रस्त

रायगड जिल्ह्यात महाडमध्ये ४९, पोलादपूर १५, रोहा ३, म्हसळा ६, माणगाव ५, पनवेल ३, खालापूर ३, कर्जत ३, सुधागड ३, श्रीवर्धन २, तर तळा तालुक्यात १ अशी एकूण १०३ गावे ही दरड कोसळण्याच्या धोक्याच्या सावटाखाली आहेत. जिल्ह्यात पुढील दोन दिवस अतिवृष्टी आणि वादळी वार्याचे संकेत दिले असल्याने या गावातील नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्याच्या सूचना स्थानिक प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

तसेच मुसळधार पावसात नागरिकांनी बाहेर पडू नये, असेही त्यांनी म्हटले आहे.



अतिवृष्टी काळात समुद्र, नदी, धरण या ठिकाणी पावसाच्या पाण्याच्या प्रवाहाचा जोर जास्त असतो. या ठिकाणी काहीजण उत्साहाच्या भरात पोहण्याचा आनंद लुटण्यास जातात. अशा वेळी त्यांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे अतिवृष्टी काळात विशेषतः युवकांनी अशा ठिकाणी पोहण्यासाठी जाऊ नये.

**निधी चौधरी, जिल्हाधिकारी रायगड**

## संक्षिप्त...

### एसटीला शासनाची ६०० कोटी रुपयांची मदत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आर्थिक अडचणीमध्ये सापडलेल्या एसटी महामंडळाल राज्य शासन ६०० कोटी रुपयांची मदत देणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष ॲड. अनिल परब यांनी दिली आहे. यामुळे एसटीच्या ९८ हजार कर्मचाऱ्यांचे रखडलेले वेतन देणे शक्य होणार आहे. तसेच या मदतीबद्दल मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्रीअजित पवार यांचे मंत्री यांचे परब यांनी आभार मानले.करोना महासाथीमुळे राज्यात १५ एप्रिल पासून दुसऱ्यांदा टाळेबंदी लागू करण्यात आली. एसटीला केवळ अत्यावश्यक सेवेसाठी प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी फक्त ५०% आसन क्षमतेने बसेस चालू ठेवण्याचे बंधन घातले होते. त्यामुळे एसटीची वाहतूक मंदावली होती. त्याचा विपरीत परिणाम एसटीच्या तिकिट महसुलावर झाला होता. गेल्या काही दिवसांमध्ये अत्यंत तुटपुंजे उत्पन्न कसेबसे एसटी महामंडळाला मिळत होते. त्यामुळे दैनंदिन खर्च भागवने देखील एसटीला शक्य नव्हते. यासाठी अनिल परब यांनी एसटी महामंडळातर्फे शासनाकडे आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव सादर केला होता. या बाबतचे सादरीकरण बुधवारी अजित पवार यांच्यासमोर करण्यात आले. त्यावेळी कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर दैनदिन खर्चासाठी ६०० कोटी रुपये पहिल्या टप्यात देण्याचे त्यांनी मान्य केले. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या अडचणीत सापडलेल्या एसटी महामंडळाला थोडा दिलासा मिळाला आहे. यापूर्वीदेखील एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी शासनाकडून तब्बल १ हजार कोटी रुपये एसटी महामंडळाला देण्यात आले होते.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव द्या

### सरकारचे लक्ष केंद्रित करण्यासाठी गुरुवारी मानवी साखळी आंदोलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव द्यावे, मागणी रायगड, नवी मुंबई, मुंबई, ठाणे, पालघर आदी जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधी, प्रकल्पग्रस्त शेतकरी, कष्टकरी, ओबीसी, विविध समाजातील जनता सुरुवातीपासून करीत आली आहे. या मागणीकडे राज्य सरकारचे दुर्लक्ष होत असल्याने गुरुवार दिनांक १० जून रोजी सकाळी १० वाजता रायगड ते अगदी मुंबई पर्यंत मानवी साखळी आंदोलन अर्थातच एल्गार होणार आहे.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या माध्यमातून होणाऱ्या या आंदोलनाला रायगड, नवी मुंबई, मुंबई, ठाणे, पालघर शेकडो संघटनांनी, वारकरी संप्रदायांनी पाठिंबा दिला असून कृती समितीचे पदाधिकारी, तसेच पाठिंबा दिलेल्या संघटना, वारकरी सांप्रदाय, विविध पक्षातील कार्यकर्ते, संस्था संघटनांचे पदाधिकारी कार्यकर्ते असे किमान ३५ हजार जण या आंदोलनात सहभागी होणार आहेत आणि तशी तयारीही जिल्हा व विभागनिहाय झाली आहे.

लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाचा आग्रह सुरुवातीपासूनच प्रकल्पग्रस्त शेतकरी, कष्टकरी जनता आणि राजकीय पक्षाचे नेते करीत आले आहेत. कारण दि. बा. पाटील यांची नवी मुंबई ही कर्मभूमी आहे. इथल्या भूमिपुत्रांना, प्रकल्पग्रस्तांना, कष्टकरी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आपले संबंध आयुष्य वेचले आहे. १९८४ साली शेतकऱ्यांच्या जमितीला योग्य भाव मिळावा यासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या व देशभर गाजलेल्या शौर्यशाली लढ्यातून शेतकऱ्यांना साडेबारा टक्के विकसित जमीन देण्याचे तत्त्व जे प्रस्थापित झाले ते पुढे संबंध महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना लागू झाले. त्यामुळे दि. बा. पाटील हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे व प्रकल्पग्रस्तांचे लोकनेते होते.

पाचवेळा आमदार, दोन वेळा खासदार, विरोधी पक्षनेते, नगराध्यक्ष अशी दमदार कारकीर्द कामगिरी दि. बा. पाटील यांची राहिली आहे. आपल्या बुलंद आवाजाने महाराष्ट्र विधीमंडळात तसेच खासदार म्हणून दिल्लीच्या सार्वभौम संसदेत शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न त्यांनी पोटतिडकीने मांडले. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसाठी आणि त्यानंतर ओबीसी समाजात जागृती करण्यासाठी त्यांनी सारा महाराष्ट्र पिंजून काढला.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ, सीमा प्रश्न अशा अनेक जनलढ्यात त्यांनी हिरीरीने भाग घेऊन तुरुंगवास भोगला आहे. त्यामुळे त्यांचे हे कार्य नव्या पिढीला स्फूर्तिदायी ठरावे यासाठी त्यांच्या कर्मभूमीत त्यांची स्मृती जागरूक राहावी यासाठी नवी मुंबईत होत असलेल्या विमानतळाला त्यांचेच नाव द्यावे, अशी मागणी विविध पक्षांच्या नेत्यांनी सामाजिक संघटनांनी तसेच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे. राज्य सरकारने याचा गांभीर्याने विचार करून दि. बा. पाटील यांचेच नाव नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे, हि मागणी घेऊन हे आंदोलन होणार आहे.

## कुंडलिका नदीवरील पुलाचे तिसऱ्या वर्षीच तीन तेरा



**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

मुंबई-गोवा महामार्गावरील कोलाड येथील कुंडलिका नदीवरील नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाच्या कामाचे तिसऱ्या वर्षीच तीनतेरा वाजले असुन या पुलावरील रस्ता उखडला असुन या पुलावर पहिल्याच पावसात पाणी साचून पुलाला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले असून यातून मार्ग काढतांना प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील रस्त्याच्या चौपदरीकरणात कोलाड कुंडलिका नदीवरील नवीन पुलाचे काम गेली तीन वर्षां पासुन पुर्ण झाला खरा परंतु या पुलाचे काम एवढे निस्कृष्ठ दर्जाचे आहे की या पुलाच्या मधोमध मोठा खड्डा पडून पुलाला वापरण्यात आलेले स्टील (तारेचे गज) वरती निघालेले ..../२

### पनवेल तहसीलदार कार्यालयात लाभार्थ्यांना अर्थसहाय्य धनादेश वाटप

## केंद्रपुरस्कृत योजनेचा लाभ पनवेल तालुक्यातील जनतेने घ्यावा : तहसीलदार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमाखाली राष्ट्रीय कुटुंब लाभ अर्थसहाय्य योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत नोंद असलेल्या १८ ते ५९ वयोगटातील कर्ता स्त्री किंवा पुरुष मरण पावल्यास त्याच्या कुटुंबीयांना एक रकमी रूपये २०,००० /- (वीस हजार ) रुपये इतके शासनाकडून अर्थसहाय्य देण्यात येते.

या पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यातील १) गुलाब चांगा कातकरी रा. चेरवली २) सरोजा अंकुश माने रा.वावेघर ३) कल्पना गणपत वाघमारे रा. तक्का पनवेल ४) बामी विष्णू दोरे रा. मालडुंगे ५) मंगला यशवंत वाघे रा. नेरे पाडा यांना प्रत्येकी रु.२०,०००/- (वीस हजार प्रमाणे अशी एकूण १००,०००/-(एक लाख) रुपयांची मदत पनवेल तहसीलदार विजय तळेकर यांच्या हस्ते देण्यात आली. संबंधीत लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटप तहसीलदार कार्यालयात करण्यात आले.

दारिद्र्यरेषेखालील ..../२

## मुसळधार पावसाने पनवेलकरांना झोडपले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मध्यरात्रीपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे पनवेल शहरासह परिसर चांगलाच जलमय झाला असून अनेक सखोल भागात पाणी साठल्याने तर काही झोपडपट्टी व तळ मजल्यातील रहिवाशांच्या घरात पाणी शिरल्याने त्या भागात भीतीयुक्त वातावरण होते.

आज मध्यरात्रीपासून पडलेला पाऊस हा साधारण ११३.६० मीमी पडल्याची नोंद आहे. या पावसाने संपूर्णतः जनजीवन विस्कळित झाले होते. पनवेलसह नवीन पनवेल, खांदा वसाहत, कामोठे, करंजाडे, खारघर, कळंबोली आदी भागात दमदार पाऊस झाला आहे. या पावसामुळे बळीराजा सुखावला असला तरी सर्वसामान्यांचे मात्र हालच झाले आहेत. लॉकडाऊन काही प्रमाणात उठल्याने व्यापाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. गिऱ्हाईक येण्यास सुरवात झाली होती. परंतु आलेल्या अचानक पावसामुळे दुकानदारांचेसुद्धा



हाल झाले आहेत. अनेकांचा माल भिजला गेला आहे. सखोल भागात पाणी साठण्याचे प्रकार दरवर्षीप्रमाणे यंदाही होत आहेत. पनवेल महानगरपालिकेचे कर्मचारी, अधिकारी तसेच स्थानिक नगरसेवक रस्त्यावर उतरून सदर पाण्याचा निचरा करून घेत आहेत. दरम्यान या काळात कुठलेही अनुचित घटना घडली नाही. पनवेल महानगरपालिका, तहसिलदार, प्रांत कार्यालय, विविध पोलिस ठाणे, अग्निशमन दल, वाहतूक शाखा आदी या पावसाला सामोरे जाण्यासाठी सतर्क व सज्ज आहेत.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९८२०३५५३४६

**ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे**

पवन अपार्टमेंट येथील लोखंडीपाडा, नवीन जिल्हा सत्र न्यायालयासमोरील जागा बँकेच्या ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे.

संपर्क : ९२२३३४५२४९


## ‘दिबां’च्या नावावर कृती समिती ठाम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई विमानतळाला नाव देण्याच्या विषयावर मुंबईत वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि. ८) रात्री बैठक झाली. या बैठकीस नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे, सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, मनसेचे आमदार राजू पाटील, कॉ. भूषण पाटील, आरपीआयचे कोकण अध्यक्ष व उपमहापौर जगदिश गायकवाड, काँग्रेसचे प्रदेश सचिव संतोष केणे, जे. डी. तांडेल, गुलाबराव वझे, तसेच महाविकास आघाडीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत मुख्यमंत्री ठाकरे यांनी दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी विमानतळ परिसरातील इतर



ठिकाण सरकारला सूचविण्याचा सल्ला समितीला दिला. प्रकल्पग्रस्तांचे नेते दि. बा. पाटील आदरणीय आहेत. त्यांनी केलेले कार्य महान आहे, मात्र बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचे जनमताने निश्चित झाल्याचा अजब दावा मुख्यमंत्र्यांनी केला. त्यामुळे महाविकास आघाडीने या बैठकीपूर्वी ‘प्री-प्लॅन’ केल्याचे अधोरेखित झाले.

असे असले तरी कृती समितीने आम्हाला कुठलाही पर्याय नको, ‘दिबां’चेच नाव नवी मुंबई विमानतळाला पाहिजे, असा निर्धार जाहीर केला.

या वेळी समितीने मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत २०१५ पासून ‘दिबां’चे नाव देण्यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले. हवाई वाहतूक मंत्र्यांपासून ते तत्कालीन मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती. असे असताना बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा प्रस्ताव आणणे संयुक्तिक नाही, असे म्हटले, मात्र बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचे निश्चित झाल्याने ‘दिबां’चे नाव देता येणार नाही, असे अप्रत्यक्षपणे मुख्यमंत्री ठाकरे यांनी समितीला सांगितले. असे असले तरी समितीने फक्त आणि फक्त ‘दिबां’चेच नाव विमानतळाला दिले गेले पाहिजे व त्यासाठी संघर्षाची तयारी दर्शवत १० जूनला मानवी साखळी ..../२

## भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जंगली भेकर ठार

**दै.रायगड नगरी । कर्जत**

जंगलाने स्वयंपूर्ण असलेल्या माथेरान मध्ये जंगली प्राण्यांचा वावर सुरू असताना येथील जंगलात भटक्या कुत्र्यांच्या हल्लयात भेकराचे पिल्लू ठार झाले असून वन विभागामार्फ़त व पशुधन विकास अधिकाऱ्यांमार्फत शवविच्छेदन करून अंत्यविधी करण्यात आला.

येथील मेरिटाईम बंगल्याच्या बाजूला असलेल्या वन विभागाच्या राखीव वनात तांबूस तपकिरी रंगाचे भेकराचे पिल्लू खाण्याच्या शोधत फिरत असताना जंगलात फिरणाऱ्या चार भटक्या कुत्र्यांनी त्या भेकरावर हल्ला केला. ते जोरजोरात ओरडत असल्याने मेरिटाईम बंगल्याचा माळी फिरोज शारवान पाहण्यासाठी गेला असताना चार कुत्र्यांनी त्याच्यावर हल्ला चढवला होता. मागच्या बाजूने त्या भेकराचे ..../२

# नवी उमेद बांधताना

पंतप्रधान नरेंद्र मोदी करोनाने भारतात प्रवेश केल्यानंतर केवळ याच विषयावर सहाव्यांदा नागरिकांशी बोलले. याशिवाय, दरमहा 'मन की बात' होते. अनेकदा ते घेत असलेल्या बैठकांचेही थेट प्रक्षेपण होते. इतके असले, तरी गेले काही दिवस करोनाशी लढण्यात भारताला अपयश येते आहे का आणि त्याची जबाबदारी कोणाची, अशी चर्चा वेग घेते आहे. अनेक उच्च न्यायालयांमध्ये हा विषय गेला. त्यांनी विविध आदेश दिले. सर्वोच्च न्यायालयाने तर आपल्या अखत्यारीत एक उच्चाधिकार गट स्थापण्याचा निर्णय घेतला. या साऱ्या चर्चेच्या मुळाशी करोनाचे नियंत्रण आणि नागरिकांचे दुहेरी लसीकरण हेच दोन प्रमुख मुद्दे आहेत. दुसरी लाट अंदाजापेक्षा काहीशी लवकर आटोक्यात येत असल्याने त्या आघाडीवर काहीशी अनुकूलता निर्माण झाली आहे. दुसरा मुद्दा लसीकरणाचा. पंतप्रधानांनी नेमका तो हातात घेऊन यापुढे केंद्र सरकार अधिक सक्रिय होणार असल्याचे या भाषणातून सूचित केले. त्याचे स्वागत करायला हवे. मात्र, एक मे रोजी केंद्र सरकारने केंद्रीय धोरण काहीसे शिथिल करून राज्यांकडे लसीकरणाची मुख्य जबाबदारी सोपविली होती. तो अत्यंत चुकीचा आणि गोंधळ वाढविणारा निर्णय होता. १८ ते ४५ या वयोगटातील नागरिकांसाठी लसीकरण खुले झाल्यावर तर हा ताण अधिकच वाढला. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने काही वेळा काहीशी कडक भाषा वापरून केंद्र सरकारला धारेवर धरले. त्यातच, महाराष्ट्रासहित अनेक राज्यांनी जगाच्या बाजारात जाऊन थेट लसखरेदी करण्याच्या ज्या फुशारक्या मारल्या, त्याचे काय फलित निघाले, ते दिसतेच आहे. अशावेळी केंद्र सरकारने राज्यांच्या झोळीत लसीकरणाची जबाबदारी टाकणे योग्य नव्हते. सुप्रीम कोर्टाने व्यक्त केलेल्या चिंतेला आता केंद्र सरकारने विधायक प्रतिसाद दिला आहे. केंद्र सरकार राज्यांकडून एक पैसाही न घेता त्यांना लसपुरवठा करणार आहे. हे प्रमाण एकूण लशींच्या उपलब्ध साठ्यापैकी ७५ टक्के असेल. आता कसोटी सर्व राज्यांची आहे. सरकारने खासगी रुग्णालयांमध्येही १५० रुपयांपेक्षा जास्त रक्कम प्रतिलस घेता येणार नाही, असे म्हटले आहे. मात्र, हे कसे पाळले जाणार आणि त्यावर लक्ष कोण ठेवणार, हा प्रश्न आहे. देशातील २३ कोटी नागरिकांचे लसीकरण पुरे झाले आहे. हा वेग जगातल्या कित्येक देशांपेक्षा जास्त आहे. भारतातील सगळ्या गोष्टींची, मोहिमांची परदेशांशी तुलना करताना भारताचा अवाढव्य आकार आणि १३० कोटींची लोकसंख्या, हे परिमाण कधीही विसरून चालत नाही. म्हणूनच पहिल्या लाटेनंतर जगातून लस येण्यास तसेच देशांतर्गत उत्पादन पुरेसे होण्यास विलंब का झाला, या प्रश्नांनी एकदम विक्राळ रूप धारण केले होते. आता १८ वर्षांवरील सर्वांचे सार्वत्रिक लसीकरण देशभरात वेग घेऊ लागल्यावर असा पेचप्रसंग पुन्हा येणार नाही, अशी अपेक्षा आहे. करोनाची साथ आटोक्यात वाटली, तरी अजून तिसऱ्या लाटेचा धोका आहे. अशावेळी, अर्थव्यवस्था रुळावर कधी येणार हा प्रश्न आहे. मात्र, काही गोष्टी अनुकूल आहेत. पहिली म्हणजे, गेल्या वर्षी अन्नधान्याचे उत्पादन विक्रमी झाले आहे आणि हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदाचा मान्सूनही उत्तम असणार आहे. जीएसटी व इतर करसंकलन उत्तम होते आहे. या पार्श्वभूमीवर मोदींच्या दुसऱ्या घोषणेकडे पाहायला हवे. 'प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना' नोव्हेंबरअखेर चालू राहणार आहे. या आधी पंतप्रधानांनी या योजनेला दोनदा मुदतवाढ दिली. मोदी यांनी ८० कोटी नागरिकांना याचा उपयोग होईल, असे म्हटले. मे महिन्यात ५३ कोटी नागरिकांनी या योजनेचा लाभ घेतल्याची नोंद आहे. नव्या वाढीव काळात यंदाचे सर्व महत्त्वाचे सण व उत्सव येऊन जातील, ही दिलासा देणारी बाब आहे. मात्र, केंद्र तसेच सर्व राज्य सरकारांनी या योजनेची अंमलबजावणी काटेकोर होते की नाही, याची डोळ्यांत तेल घालून काळजी घ्यावी. रेशन कार्डे नसणाऱ्यांना आणि पूर्णपणे परावलंबी असणाऱ्या नागरिकांपर्यंत ही योजना घेऊन जाण्याचे आव्हान आहेच. करोना आटोक्यात येत असताना सगळ्या सामाजिक संघटनांनी या योजनेच्या कार्यवाहीत लक्ष घालावे. मोदींचे हे भाषण झाल्यानंतर 'ते केवळ कल्याणकारी योजनांचा पाऊस पाडत असून आवश्यक त्या आर्थिक सुधारणांकडे मात्र लक्ष देत नाहीयेत,' अशी टीका काही अर्थतज्ज्ञांनी केली. ती खरी असली तरी आज देशातील माणसे जगविणे आणि त्यांना या काळ्या कालखंडातून बाहेर काढून नव्या उमेदीने उभे करणे, हे सगळ्यांत मोठे आव्हान आहे. मोफत धान्य व मोफत लस या दोन्हींकडे या दृष्टीने पाहून ही दोन्ही लक्ष्ये सगळ्यांनी मिळून साध्य करायला हवीत.

# माथेरान शिवसेना शाखेचा ३४ वा वर्धापनदिन साजरा



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये शिवसेना शाखेचा ३४ वा वर्धापनदिन आज दि. ९ जून रोजी प्रसादभाई जनसंपर्क कार्यालयात मोठ्या आनंदाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी आजी-माजी पदाधिकारी,नगराध्यक्षा प्रेरणा सावंत त्याचप्रमाणे जेष्ठ शिवसैनिकांच्या उपस्थितीत छोटेखानी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्ध पुतळ्याला नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी पुष्पहार अर्पण केला तर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला जेष्ठ शिवसैनिक दता बाळकृष्ण सुतार आणि ज्ञानेश्वर बागडे यांनी पुष्पहार अर्पण केला. दिवंगत शिवसैनिक हेमंत बिरामणे यांच्या प्रतिमेला माजी नगराध्यक्ष विवेक चौधरी, माजी नगरसेवक अवधूत येरफुले यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी शिवसेनेतील सर्वधर्मीय समाजबांधवांनी या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली तर शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी हे काही कारणास्तव उपस्थित राहू शकले नाहीत.

शिवसेना स्थापन झाल्यापासून आजपर्यंत ज्या जेष्ठ शिवसैनिकांनी अनेक चढउतार अगदी जवळून पाहिले आहेत. अन्य पक्षाच्या मंडळींकडून त्यावेळी होत असलेली वागणूक त्याचप्रमाणे गावात एकप्रकारे स्वतःची मक्तेदारी होती अशा राजकीय पक्षांच्या लोकांना शिवसेना स्टाईलने उत्तरे देत आपला शिवसेना पक्ष आणि त्याची भूमिका ही सदैव जनसामान्यांच्या हितासाठी खर्च केलेली आहे.१९९६ नंतर पहिल्यांदाच २०१६ मध्ये नगरपरिषदेत स्वबळावर शिवसेनेची सत्ता स्थापन करण्यात आली. यामध्ये २०१५ साली शिवसेनेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामधून प्रवेश करणारे प्रसादभाई सावंत यांची मोलाची साथ मिळाली होती.प्रसाद भाई सावंत यांनी सर्व शिवसैनिकांना सोबत घेऊन जेष्ठ आजी माजी पदाधिकाऱ्यांना विच-ारात घेऊन सत्ता स्थापन केली होती. काही दिवसांपूर्वी शिवसेनेतील काही नगरसेवकांनी नुकताच भाजप मध्ये प्रवेश केला आहे त्यामुळे शिवसेनेची ताकद आणि ऊर्जा किंचित सुध्दा कमी झाली नसून या कार्यक्रमादरम्यान नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी सांगितले की,आपण ३४ वर्षांपूर्वी शिवसेनेचे जे रोपटे लावले होते त्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. आज जरी कितीही राजकीय वादळे आली तरी यातून एखादी फांदी तुटून गेली असेल परंतु शिवसेनेच्या वटवृक्षाला जराही धोका संभवला नाही कारण याच वृक्षाच्या खाली आपल्या एकीचे आणि ताकदीचे खत पाणी याचा सातत्याने स्त्रोत कायमस्वरूपी ठेवल्यास पक्षाचे हे वृक्ष आणखीन बहरणार आहे त्यासाठी कुणीही डगमगून चालणार नाही असे स्पष्ट केले. आगामी निवडणुका पाच महिन्यांवर येऊन ठेपल्या आहेत त्यासाठी सर्व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन लवकरच चिंतन बैठकीचे आयोजन करण्यात यावे असे वनसमिती अध्यक्ष योगेश जाधव यांनी संपर्क प्रमुख प्रसादभाई सावंत यांना सांगितले. यावेळी नगरसेवक शकील पटेल, माजी नगरसेवक प्रकाश सुतार, अवधूत येरफुले,लक्ष्मण कदम, सुहासिनी शिंदे, नितीन विश्वनाथ सावंत,यांनीही आपले अनमोल विचार प्रकट केले.२०१५ मध्ये आपल्या कुटुंबासह प्रसादभाई सावंत यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत विनाशर्त प्रवेश करणारे फकीर बेपारी, महिला आघाडीच्या प्रीती कळंबे, शलाका शेलार, नगरसेविका कीर्ती मोरे,अर्चना सावंत, संगीता जांभळे, समिना महापुळे, श्रुतीका दाभेकर, हेमा कदम,योगिता चौगुले, अनंत शेलार, सूर्यकांत कारंडे, विजय ( राजू )सावंत, नगरसेवक राजेंद्र शिंदे,माजी नगरसेवक नारायण कदम, संदीप शिंदे,आरपीआय अध्यक्ष अनिल गायकवाड,युवा सेनेचे निमेश मेहता,समीर पन्हाळकर, गणेश घावरे,दत्ता सनगरे, राजू कदम, गणेश कदम, सिताराम शिंदे,अवि परब, मनोहर चाळके, गौरंग वाघेला यांसह अन्य शिवसैनिक, महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवी मुंबई विमानतळाला नामांतर वादाविषयी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल

**दै.रायगड नगरी । उरण**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते, लोकनेते दि. बा. पाटील साहेब यांचे नाव दिले गेले पाहिजे, अशा मागणीसाठी पनवेल तालुक्यातील कोपर (गव्हाण) येथील ड. नित्यानंद राम ठाकूर यांनी ०८ जून रोजी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे.



आंतरराष्ट्रीय विमानतळाला सुरुवात झाली तेव्हापासून, स्थानिक भूमिपुत्रांचे नेते माजी खासदार दि. बा. पाटील यांचे नाव या विमानतळाला देण्यात यावे, अशी मागणी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड, पालघर आदी जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधी, प्रकल्पग्रस्त शेतकरी, कष्टकरी जनता सुरुवातीपासून करीत आहे. त्याबाबतचा पत्रव्यवहार राज्य व केंद्र सरकारकडे करण्यात आला आहे. असे असताना अचानकपणे १७ एप्रिल रोजी सिडकोच्या संचालक मंडळाने लोकभावनेचा विचार न करता शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचा प्रस्ताव मंजूर केला. त्यामुळे सर्व जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्त, शेतकरी, कष्टकरी जनतेत प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

२ जानेवारी २०१५ रोजी खासदार कपिल पाटील यांनी लोकभावनेचा विचार करून लोकसभेत ही मागणी केली. त्या संबंधीचे पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिले आहे. तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे तत्कालीन अध्यक्ष व सध्याच्या मंत्रीमंडळातील सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री अशोक चव्हाण यांच्याकडे दि. बा. पाटील यांच्या नावाचा प्रस्ताव दिला असता त्यांनी तो तत्कालिन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे १९ जून २०१८ रोजी पाठवला. देवेंद्र फडणवीस यांनीसुद्धा तो प्रस्ताव उचित कार्यवाही करण्याच्या सूचनेसह प्रधान सचिव (विमानचालन) यांच्याकडे पाठविला होता. तसे ७ जुलै २०१८ रोजी अशोक चव्हाण यांना मुख्यमंत्र्यांनी लेखी कळविलेही होते.

तसेच अनेक स्थानिक आगरी-कोळी आणि दहा गाव संघटनांच्या वतीने सिडकोकडेही मागणीही केली होती. पण ही लोकभावना लक्षात न घेता सिडकोने आता जी कृती केली आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये सिडकोविरुद्ध तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे,

इथल्या भुमिपुत्रांना, प्रकल्पग्रस्तांना, कष्टकरी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आपले संबंध आयुष्य वेचले आहे. १९८४ साली शेतकऱ्यांच्या जमिनीला योग्य भाव मिळावा यासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या व साऱ्या देशभर गाजलेल्या शौर्यशाली लढ्यातून शेतकऱ्यांना साडेबारा टक्के विकसित जमिन देण्याचे तत्त्व जे प्रस्थापित झाले ते पुढे संबंध महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना लागू झाले. त्यामुळे दि. बा. पाटील हे साऱ्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे व प्रकल्पग्रस्तांचे लोकनेते होते.

आपल्या बुलंद आवाजाने महाराष्ट्र विधीमंडळात तसेच खासदार म्हणून दिल्लीच्या सार्वभौमत संसदेत शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न त्यांनी पोटतिडकीने मांडले. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसाठी आणि त्यानंतर ओबीसी समाजात जागृती करण्यासाठी त्यांनी सारा महाराष्ट्र पिंजून काढला. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, सीमाप्रश्न अशा अनेक जनलढ्यात त्यांनी हिरहिरीने भाग घेवून तुरुंगवास भोगला आहे. त्यामुळे त्यांचे हे कार्य नव्या पिढीला स्फूर्तीदायी ठरावे यासाठी त्यांच्या कर्मभूमीत त्यांची स्मृती जागृत राहावी यासाठी नवी मुंबईत होत असलेल्या विमानतळाला त्यांचेच नाव द्यावे, अशी मागणी सर्व पक्षाच्या नेत्यांनी, सामाजिक संघटनांनी तसेच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केली असताना, पनवेल तालुक्यातील कोपर गव्हाण येथील ड नित्यानंद राम ठाकूर यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे.

# रावे येथे धडक कारवाई जवळपास पाच लाखांचा मुद्देमाल जप्त

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या रायगड जिल्ह्याच्या अधीक्षक श्रीमती कीर्ती शेडगे, उप अधीक्षक श्री. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य उत्पादन शुल्क, मुरुड विभागाचे निरीक्षक आनंद पवार यांच्यासह पथकातील श्री.अकुंश बुरकुल, दुय्यम निरीक्षक, रोहा, श्री.रमेश चाटे, दुय्यम निरीक्षक, खालापूर-सुधागड, श्रीमती नरहरी, सहायक दुय्यम निरीक्षक, जवान श्री.गणेश नाईक, श्री.गणेश घुगे यांनी दि.०८ जून २०२१ रोजी पेण तालुक्यातील मौजे रावे येथे छापा टाकून धडक कारवाई केली.



या धडक कारवाईत तब्बल ४ गुन्हे नोंद करण्यात असून १० लिटर गावठी दारू, ५ हजार ८२५ लिटर रसायन, असा एकूण रुपये १ लाख ३८ हजार २००/-किंमतीचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे.

# नरेश भाटकर नेव्हीतून सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

नेव्ही सिव्हिलियन इंडस्ट्रीयल स्टाफ नरेश सुदाम भाटकर हे तीस वर्षाहून अधिकची उत्कृष्ट सेवा नेव्हल ऑर्गनायझेशनला देत सन्मानपूर्वक नुकतेच सेवानिवृत्त झाले आहे.



रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील सायगाव - काळींजे गावाचे सुपुत्र नरेश भाटकर सन १९९० पासून नेव्हल ऑर्गनायझेशन मधील टाईम किपिंग सेक्शन मध्ये कार्यरत होते. अत्यावश्यक वेळेत आपल्या सेक्शन व्यतिरिक्त इतर विभागाच्या कामकाजाला देखील ते आवर्जून हातभार लावत असत,त्यांना तांत्रिक बाबीचें चांगले ज्ञान असून वेळप्रसंगी मोठ्या क्रेन्स,फोरक्लिप इत्यादी. अवजड मशिनरी त्यांनी सहज चालविल्या. अचूक व वेगवान काम करण्याचा त्यांच्या पद्धतीमुळे ते कायम वरिष्ठ अधिकारांच्या मर्जीत राहिले. नरेश भाटकर यांचा स्वभाव कष्टाळू,मेहनती,प्रेमळ व मनमिळावू असल्यामुळे कामाच्या ठिकाणी अनेकांशी त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध बनले. त्यांच्या उल्लेखनीय व वैशिष्ट्यपूर्ण कामाची दखल वारंवार नेव्हीनी घेतली आणि त्यामुळेच अनेक प्रशस्तिपत्र व अँवार्ड त्यांना त्यांच्या सेवाकाळात मिळाले आहेत.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## कुंडलिका नदीवरील पुलाचे तिसऱ्या वर्षीच तीन तेरा

असून यामुळे वाहन चालक व प्रवाश्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.

ब्रिटिश काळीन बांधण्यात आलेले पूल पन्नास वर्षे झाली तरी त्यांना काही भंग होत नव्हते परंतु मुंबई-गोवा हायवे वरील चौपदरी करण्याच्या कामात कोलाड कुंडलिका नदीवरील नवीन पुलाचे काम तीन वर्षांपूर्वीच पुर्ण केले असुन सुप्रीम कंपनी कडून एवढे सुपर काम केले आहे की तीन वर्षात या पुलाचे कामाचे तीनतेरा वाजले असुन या जीवघेण्या पुलाची संबंधितांनी पहाणी करुन योग्य ती दुरुस्ती करावी अशी मागणी पुई ग्रामपंचायत माजी सरपंच असिफशेठ सैय्यद यांनी केली आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील कोलाड हे बाजार पेठेतील मध्यवर्ती ठिकाण असुन य़ा मार्गावर शाळा, कॉलेज, तलाठी कार्यालय, पोलिस स्टेशन, बँका,गजबजलेली बाजापेठ असल्याने कोलाड परिसरातील आजूबाजूला असणाऱ्या ३५ते ४०गावातील नागरिक येथे येत असलेल्या नागरिकांनमुळे येथे मोठी वर्दळ दिसुन येते.तर मुंबई गोवा पुणे आदी ठिकाणी जाणारी येणारी वाहने यांची देखील मोठया प्रमाणावर वाहतुक सुरु असते यामुळे या पुलावरील उखडलेल्या रस्त्यामुळे पुलाला वापरण्यात आलेले स्टील वर निघाले आहेत शिवाय या खड्ड्यामुळे पहिल्याच पावसात या पुलाला तलावाचे स्वरूप निर्माण झाले असून यातुन मार्ग काढतांना वाहनचालक यांना तारेवरची कसरत करावी लागत असुन यामुळे प्रवाशी वर्गाच्या जिवाला धोका निर्माण झाला असू यामुळे संबंधितांनी याकडे त्वरीत लक्ष देऊन योग्य ती उपाय योजना करावी अशी मागणी प्रवाशी वर्गाकडुन केली जात आहे.

## केंद्रपुरस्कृत योजनेचा लाभ पनवेल तालुक्यातील जनतेने घ्यावा : तहसीलदार

कुटुंबातील कर्ता स्त्री किंवा पुरूष मरण पावल्यास यापूर्वी या योजनेचा लाभ घेण्यासाठी कर्ता स्त्री किंवा पुरुष हा मयत झालेल्या दिवसापासून ते १ वर्षाच्या आत तहसीलदार कार्यालयाकडे अर्ज करणे आवश्यक होते. त्यात सुधारणा करून आता शासनाने ही मुदत मयत दिनांकापासून तीन वर्षापर्यंत वाढवलेली आहे. अशा लाभार्थ्यांनी कुटुंबातील कर्त्या स्त्री-पुरुषाचे निधन झाल्यास आणि ती व्यक्ती दारीद्रय रेषेखालील असल्यास विहीत नमुन्यातील फॉर्म भरून या केंद्रपुरस्कृत योजनेचा लाभ पनवेल तालुक्यातील जनतेने घेण्याचे आवाहन तहसीलदार विजय तळेकर केले आहे. यावेळी संजय गांधी निराधार योजनेचे नायब तहसीलदार एकनाथ वि. नाईक, निवासी नायब तहसीलदार संजिव मांडे, संगायो शाखेतील कर्मचारी व लाभ देण्यात आलेल्या व्यक्तीचे गावातील संबधीत तलाठी उपस्थित होते.

## 'दिबां'च्या नावावर कृती समिती ठाम

आंदोलन तर २४ जूनला सिडकोला घेराव घालणार असल्याचे स्पष्ट केले.

आपण सगळ्यांनी दि. बा. पाटील साहेबांचे नाव देण्यासाठी संघर्षात उतरले पाहिजे. आंदोलनात कोविडचा प्रोटोकॉल पाळू, पण तो पाळत असताना आम्हाला साखळी आंदोलन करण्यास रोखल्यास ठरलेल्या आपापल्या योजनेप्रमाणे जनतेला त्रास न देता रस्त्यावर उतरून 'दिबां'च्या नावासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू या. आपण १० आणि २४ तारखेला जोरात लढायचे आणि भूमिपुत्र किती प्रखर आहेत आणि भूमिपुत्रांच्या भावना किती प्रखर आहेत हे सरकारला दाखवून दिल्याशिवाय हा निर्णय बदलेल, असे वाटत नसल्याचे या वेळी कृती समितीचे कार्याध्यक्ष आमदार आमदार प्रशांत ठाकूर या वेळी म्हणाले.

## भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जंगली भेकर ठार

लचके काढत होते. फिरोज शारवान यांनी त्या कुत्र्यांना हाकलण्याचा प्रयत्न केला.तो पर्यंत भेकर खूप जखमी झाले होते. शेवटी शारवान यांनी काठीने मारून त्या भेकराची सुटका केली.ते जखमी असताना प्रथमोपचार म्हणून त्यांनी जखमेवर हळद लावली व वन विभागाला पाचारण केले.वन विभागाचे वनपाल शंकर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक ज्ञानेश्वर मोरे,देवराव आदेवाड, महिला वनरक्षक प्रतिभा कडू,वन मजूर काळूराम जामघरे हे घटनास्थळी हजर झाले मात्र तोंपर्यंत खूप उशीर झाला होता.

पशुधन अधिकारी डॉ.अरुण राजपूत यांनी पूर्ण तपासणी करून त्याला मृत घोषित केले.त्याचा मागचा भाग कुत्र्यांनी पूर्णपणे खाऊन फस्त केला होता.डॉक्टरांनी त्या भेकराचे शवविच्छेदन केले.

# हजारो कोटी रुपयांचे अनुदान मिळणार आहे असे आमिश दाखवून १ कोटी ९७ लाखांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आरटीआय चारीटेबल ट्रस्टचे आयसीआयसीआय व इतर बँकांचे बनावट स्टेटमेंट आणि बँकेची बनावट एफडी बनवून त्या खरे आहेत असे भासवून हजारो कोटी रुपयांचे अनुदान मिळणार आहे असे आमिष दाखवून पंधरा जणांची एक कोटी ९७ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी आरोपींविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निवृत्त शासकीय अधिकारी असलेले जगन्नाथ खंडेराव जाधव हे औरंगाबाद येथे राहतात. यावेळी त्यांना स्वामी देवजी हंस यांचे खारघर येथे आरटीआय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट असून या ट्रस्टकडे हजारो कोटी रुपये आहेत व ते त्यांना चांगल्या कार्यासाठी दान करावयाचे आहेत अशी माहिती मिळाली. व आरटीआय ट्रस्टमध्ये सदस्य होण्यासाठी पाच लाख रुपये भरावे लागतात असे त्यांना एकाने सांगितले. यावेळी ते सेक्टर ७, खारघर येथील ट्रस्ट मध्ये आले असता विपुल वाखाणी यांनी त्यांच्या फाईल मधील आरटीआय ट्रस्टच्या आयसीआयसीआय बँकेत सात हजार ८८९ कोटी रुपये शिल्लक असल्याचे बँकेचे स्टेटमेंट दाखवले.

यावेळी श्री स्वामी देवजी हंस यांनी महाराष्ट्रातल्या अनेक जिल्ह्यात त्यांचे प्रतिनिधी असून ते जिल्ह्यातील उद्योगपती, शैक्षणिक संस्था चालक, शेतकरी, प्राध्यापक यांना भेटून स्वामीजींच्या ट्रस्टकडे हजारो कोटी रुपये आहेत व त्यांना चांगल्या कार्यासाठी दान करावयाचे असल्याचे सांगत असतात असे सांगितले. त्यांच्या या बोलण्यावर विश्वास ठेवून पाच लाख रुपये किमतीचे २ चेक आरटीआय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट या नावाने २०१९ मध्ये जगन्नाथ जाधव यांनी दिले. यावेळी त्यांच्या लेटरहेडवर स्वामी देवजी हंस यांनी स्वाक्षरी करून वेलकम लेटर व ठराव पत्र दिले. त्यानंतर जाधव यांनी सामाजिक कार्यासाठी आर्थिक मदत मिळण्यासाठी आरटीआय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे स्वामी देवजी हंस व विपुल वाखाणी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी चेक घेण्यासाठी खारघर येथे येण्यास सांगितले. यावेळी त्यांनी प्रत्येकी पाच कोटी रकमेचे २ चेक जाधव यांना दिले. व ते चेक सांगितल्याशिवाय टाकू नका असे सांगितले.

तीन महिन्यांनी चेकची तारीख व पेऑर्डरची तारीख उलटून गेल्याने स्वामी हंस व वाखाणी यांच्याशी जाधव यांनी संपर्क साधला असता ट्रस्टच्या ४०० कोटी रुपयांची इन्वेस्ट एफडी करत आहोत व व त्या एफडीच्या आधारे ते ३० कोटी रुपये देऊ असे सांगण्यात आले. व पुन्हा एफडीची रक्कम स्वीकारण्यासाठी खारघर येथील ऑफिस मध्ये येण्यासाठी सांगितले. जाधव ऑफिसमध्ये आले असता बँकेचे अधिकारी राहुल भगत व संदीप भगत यांनी फिनो पेमेंट बँकेत दहा एक कोटीची एफडी करण्यात येईल व एफडीएच्या आधारे २० टक्के रक्कम ४५ दिवसात कर्ज म्हणून सर्वांच्या फिनो पेमेंट बँकेतील खात्यात जमा होईल असे सांगितले. त्यामुळे जाधव यांनी पती-पत्नीचे खाते बँकेत उघडून घेतले. यावेळी जाधव यांच्याकडून शंभर रुपयाच्या पाच कोऱ्या स्टॅम्प पेपर वर सह्या घेऊन ते लोनच्या कामासाठी बाँड लिहून घेण्यासाठी घेतले असून ते स्वामी व वाखाणी यांनी ठेवले असल्याचे सांगण्यात आले.

ऑगस्ट २०१९ मध्ये पाच कोटी रकमेची दोन्ही चेकची तारीख उलटून गेली. त्यामुळे त्या बदल्यात पंधरा दिवसात जाधव यांच्या नावे २० कोटी व पत्नीच्या नावे १० कोटी रकमेची एफडी उघडतो असे सांगण्यात आले. त्यानंतर पुन्हा स्वामी देवजी हंस व विपुल वाखाणी यांच्याशी संपर्क साधला असता जुलै २०२० मध्ये कर्जाची रक्कम फिनो बँकेच्या खात्यावर जमा होईल असे सांगण्यात आले. मात्र रक्कम काही जमा झाली नाही. त्यानंतर ऑगस्ट २०२० मध्ये जमा होतील असे सांगण्यात आले. ऑगस्ट मध्ये देखील कर्जाची रक्कम खात्यावर जमा न झाल्याने स्वामी हंस व विपुल वाखाणी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देऊन फोन घेण्यास टाळाटाळ केली. यावेळी जाधव यांनी इतर लोकांकडे चौकशी केली असता अनेक लोकांची फसवणूक झाल्याचे त्यांना समजले.त्यामुळे आरटीआय चॅरिटेबल ट्रस्टचे देवीप्रसाद तिवारी उर्फ स्वामी देवजी हंस, विपुल वाखाणी, फिनो बँकेचे अधिकारी राहुल भगत, संदीप भगत यांनी बनावट एफ डी बनवून त्या खऱ्या असल्याचे भासवून करोडो रुपयांचे अनुदान मिळणार आहे असे आमिष दाखवले आणि १५ जणांकडून १ कोटी ९७ लाख रुपये घेऊन फसवणूक केली. त्यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## उरणमधील रुग्णालयातील तपासणी अहवालातील त्रुटींची १५ जून पर्यंत पूर्तता करण्याचे आदेश

**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्हयातील खासगी व शासकीय रुग्णालयातील तपासणी समिती मार्फत करण्यात आली. या तपासणी अहवालात उरणमधील ३ रुग्णालयावर ठपका ठेवत येत्या १५ जून पर्यंत पूर्तता करून तशा प्रकारचा अहवाल सादर करण्याचे आदेश निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पदमश्री बैनाडे यांनी दिले आहेत.

जिल्ह्यातील खासगी व शासकीय रुग्णालयातील ऑक्सिजन वायू नलिका व प्रणालीची तपासणी करण्यासाठी नेमण्यात पथक नेमण्यात आले होते. या पथकाने तपासणी करून ज्या रुग्णालयाच्या तपासणीत ज्या त्रुटी आढळल्या आहेत. त्यामध्ये उरणमधील ३ रुग्णालयाचा समावेश आहे.

उरणमधील डीसीएचसी सिडको ट्रेनिंग बोकडविरा येथील रुग्णालयातील ऑक्सिजन पुरवठा करणाऱ्या टाकी व संबंधित प्रणालीचे मागील शेड्युल मेंटन्स केलेले नाही, रुग्णालयाचे फायर ऑडीट केल्याचे प्रमाणपत्र नाही, इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट केलेले नाही.

जेएनपीटी डिसीएचसी रुग्णालयातील ऑक्सिजन पुरवठा करणाऱ्या पाईप लाईनची पुनर्बांधणी आवश्यक आहे, फायर ऑडीट केल्याचे प्रमाणपत्र नाही, इमारतीचे स्ट्रक्चल ऑडीट केलेले नाही, ऑक्सिजन सिलेंडर टेक्निशनची नेमणूक केलेली नाही. तर जासई येथील संजीवन रुग्णालय डिटीएचमध्ये फायर ऑडीट करण्यात आलेले नाही, फायर एक्सटीगुइशेरची मुदत संपली आहे, इमारतीचे स्ट्रक्चल ऑडीट झालेले नाही. अशा प्रकारचा ठपका संबंधित ३ रुग्णालयावर ठेवण्यात आला आहे.

निवासी उपजिल्हाधिकारी पदमश्री बैनाडे जिल्ह्यातील शासकीय व खासगी रुग्णालयातील तपासणी अहवालातील उरणमधील रुग्णालयाने सदर त्रुटींची पूर्तता करून १५ जून पर्यंत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

## अल्पवयिन मुलीचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अल्पवयिन मुलीचे कोणीतरी अज्ञात इसमाने कायदेशीर रखवालीतून फूस लावून अज्ञात कारणासाठी पळवून नेल्याची घटना तालुक्यातील टेमघर नेरे या भागात घडली आहे. सदर मुलीचे वय १५ वर्षे ०७ महिने असून रंग गहुवर्ण, बांधा मजबूत, चेहरा गोल, नाक सरळ, उंची ५ फूट, केस काळे व लांब, गळ्यात तुळशीची माळ असून अंगात तांबडा रंगाचा कुर्ता व ग्रीन रंगाची लेगिन व ओढणी आहे. पायात क्रिम रंगाची सँडल घातली आहे. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलिस ठाणे दुरध्वनी-०२२२७४५२४४४ किंवा सपोनि आर.एस. गोपाळ यांच्याशी संपर्क साधावा.

# आपत्तीवर मात करण्यासाठी प्रशासनास सहकार्य करण्याचे : वैशाली परदेशी-ठाकूर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भारतीय हवामान विभागाने दि. ०९ ते १२ जून २०२१ या कालावधीमध्ये अतिवृष्टी होण्याची शक्यता असल्याचा इशारा दिलेला आहे.

या पार्श्वभूमीवर अनावश्यक घराबाहेर न पडता घरी राहूनच आपत्तीवर मात करण्यासाठी शासनास सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने कर्जत उपविभागीय अधिकारी श्रीमती वैशाली परदेशी- ठाकूर यांनी केले आहे.

कर्जत उपविभागातील आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित काम करणाऱ्या सर्व शासकीय व स्थानिक प्रशासन यांनी परस्पर समन्वयाने काम करण्याच्या दृष्टीकोनातून दि.८ जून २०२१ रोजी सर्व लोकप्रतिनिधी व प्रशासकीय यंत्रणा यांची ऑनलाईन बैठक कर्जत उपविभागीय अधिकारी श्रीमती वैशाली परदेशी-ठाकूर यांनी आयोजित केली होती.

या ऑनलाईन बैठकीत उपविभागातील सर्व जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगराध्यक्ष कर्जत/खोपोली/माथेरान नगरपरिषद, सर्व ग्रामपंचायत सरपंच, उपविभागीय पोलीस अधिकारी कर्जत/खाला-पूर, तहसिलदार कर्जत/खालापूर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत/खालापूर, मुख्याधिकारी कर्जत/खोपोली/माथेरान नगरपरिषद/खालापूर नगरपंचायत,मंडळ अधिकारी, ग्रामसेवक सहभागी झाले होते.

या बैठकीमध्ये दरडग्रस्त भागातील, पूरप्रवण भागातील व धोकादायक इमारतीमधील नागरिकांचे सुरक्षित ठिकाणी आवश्यकतेनुसार स्थलांतर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. या दृष्टीकोनातून जवळच्या सुरक्षित निवारा केंद्राचे नियोजन करुन त्या ठिकाणी पाणी, मूलभूत सुविधा व स्वच्छतागृहाची सुविधा असेल, याची दक्षता घेवून अन्नधान्य, खाद्यपदार्थांची उपलब्धता होईल, याचे नियोजन स्थानिक प्रशासनामार्फत केले जाईल. तरी पूरप्रवण, दरडग्रस्त भागातील व अतिधोकादायक इमारतीतील नागरिकांनी प्रशासनाच्या आवाहनास प्रतिसाद देवून आपत्कालीन परिस्थितीत नजीकच्या निवारा केंद्रात वा आपल्या नातेवाईकांकडे दि.०९ जून २०२१ पूर्वी तात्पुरत्या स्वरुपात सुरक्षित स्थळी स्थलांतरीत व्हावे, असे आवाहन करण्यात आले. याबाबत सर्व नगरपरिषदा, सर्व नगर पंचायत, ग्रामपंचायत यांनी स्पीकरद्वारे सर्व नागरिकांना अतिवृष्टीबाबत सूचना प्रसारित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या कालावधीत तालुक्यासाठी नियंत्रण कक्ष २४ तास कार्यन्वित करण्यात आले आहे. सर्व स्थानिक यंत्रणांनी/ नागरिकांनी आपत्कालीन परिस्थितीत नियंत्रण कक्षाच्या संपर्कात राहावे. जेणेकरुन मदतकार्य वेळेत सुरु करणे शक्य होईल, असे सांगण्यात आले. नियंत्रण कक्षाचे दूरध्वनी क्र.तहसिल कार्यालय,कर्जत ०२१४८-२२२०३७, तहसिल कार्यालय,खालापूर ०२१९२-२७५०४८ व जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग ०२१४१-२२२११८ असे आहेत. तसेच जिल्हा मार्ग, अंतर्गत रस्त्यावर झाडे, दरड पडून वाहतूक विस्कळित होणार नाही, याबाबत उपाययोजना करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. कर्जत उपविभागातील धोकादायक/उंच होर्डींग/ जाहिरातींचे बोर्ड काढून टाकण्यात यावेत. मेनहोल उघडे राहणार नाहीत, त्यांना झाकण टाकणे वा बॅरीकेटींग करणे, याबाबतही सूचना देण्यात आल्या आहेत.

त्याचप्रमाणे सर्व नागरिकांनी अतिवृष्टीच्या अनुषंगाने काळजी घेण्याबाबत आवाहन करण्यात आले असून नागरिकांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत:-

१)घराच्या अवती-भोवती वादळामुळे/ अतिवृष्टीमुळे कोणत्याही वस्तू, विजेचे खांब किंवा तारा, झाडे, होर्डींग्ज/बोर्ड इत्यादी पडण्याची शक्यता असल्यास अशा वस्तूप-ासून लांब राहावे. तसेच प्रत्येक बाब तात्काळ स्थानिक प्रशासनाच्या निर्दशनास आणून द्यावी. २)आपले पशूधन व अन्य पाळीव प्राणी यांना अगोदरच सुरक्षित स्थळी हलवावे. ३)आपल्या जवळ दैनंदिन लागणारी औषधे, केरोसीनवर चालणारे बंदिस्त दिवे (कंदील), बॅटरी, गॅसबत्ती, स्टोव्ह, काडीपेटी इत्यादी वस्तू ठेवाव्यात. ४) अतिवृष्टीच्या कालावधीमध्ये किमान ३ दिवस पुरतील, असे सुका मेवा/खाद्यपदार्थ जवळ ठेवावेत, सोबत आवश्यक अन्नधान्य, पिण्याचे पाणी औषधे जवळ ठेवावे. ५)पिण्याचे पाणी शुद्धीकरण करुन वापरावे. उदा.पाणी उकळून प्यावे तसेच पाण्यात मेडीक्लोर मिसळावे. ६) अतिवृष्टी फटका टाळण्यासाठी दरडप्रवण भागातील व अतिधोकादायक इमारतीतील तसेच नदीकिनारी राहणाऱ्या सखल भागातील लोकांनी सावधगिरी बाळगावी. तसेच प्रशासनामार्फत केलेल्या निवारागृहामध्ये स्थलांतरीत व्हावे. आपला जीव आपल्या मिळकतीपेक्षा महत्त्वाचा असल्यामुळे प्रथम जीवितास प्राधान्य द्यावे. ७)या कालावधीमध्ये नागरिकांनी आवश्यकता नसेल तर घराच्या बाहेर पडूच नये. ८) दि.११ जून ते दि.१३ जून २०२१ या कालावधीत अत्यावश्यक सेवा सोडून इतर सर्व आस्थापना बंद ठेवण्यात येणार असल्याने आपल्याला आवश्यक अन्नधान्य, भाजीपाला, औषधे इत्यादीचा साठा जवळ बाळगावा.

या आपत्कालीन परिस्थितीत अनावश्यक घराबाहेर न पडता घरी राहूनच आपत्तीवर मात करण्यासाठी शासनास सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने कर्जत उपविभागीय अधिकारी श्रीमती वैशाली परदेशी-ठाकूर यांनी केले आहे.

## लोकल मधील प्रवाशाला लुटणारे दोघे लुटारु जेरबंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोकलमधील प्रवाशाचे पाकिट जबरदस्तीने लुटून पळून गेलेल्या दोघा लुटारुंना वाशी रेल्वे पोलिसांनी अटक केली आहे. विशाल शंकर शिंदे (२५) व शाहरुख सोहेल अन्सारी (२६) असे या लुटारुंची नावे असून त्यांनी प्रवाशाकडून लुटलेले पाकिट त्यांच्याकडून हस्तगत केले आहे.

या घटनेतील तक्रारदार सुरज देसाई हे हार्बर रेल्वे मार्गावरुन कुर्ला ते पनवेल असा प्रवास करत होते. सदर लोकल गोवंडी रेल्वे स्थानकातून मानखुर्दच्या दिशेने जाण्यासाठी निघाली असताना, दोघा लुटारुंनी सुरज देसाई यांच्या पॅन्टच्या खिशातील पाकीट जबरदस्तीने काढुन घेऊन गोवंडी रेल्वे स्थानकात उतरुन पलायन केले होते. याबाबत वाशी रेल्वे पोलीस ठाण्यात दोघा लुटारुंविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर रेल्वे पोलिसांनी गोवंडी रेल्वे स्थानकातील सीसीटीव्ही फुटेज वरुन आरोपींचे वर्णन मिळविले. त्यानंतर पोलिसांनी गुप्त बातमीदारामार्फत आरोपींची माहिती काढली असता, सदर आरोपी हे गोवंडी येथील बैंगणवाडी भागात रहाण्यास असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णु केसरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ए.सी. आढाव व गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने बैंगणवाडी भागात सापळा लावून विशाल शिंदे व शाहरुख अन्सारी या दोघांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी त्यांची अधिक चौकशी केली असता, त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केले. त्यानंतर त्यानां अटक करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णु केसरकर यांनी दिली. या दोघांनी अशाच प्रकारचे गुन्हे केले असण्याची शक्यता असल्याने त्यांची चौकशी करण्यात येत असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

## सायकलिस्ट स्नेहल शत्रुघ्न माळी हिला महानगरपालिकेतर्फे शिष्यवृत्ती देऊन आले गौरविण्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आज पनवेल महानगरपालिकेच्या महापौर सौ डॉ कविता चौतमोल यांचे हस्ते सायकलिस्ट स्नेहल शत्रुघ्न माळी वय १४ वर्षे हिने २५ व्या राष्ट्रीय सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत कास्य पदक पटकावले म्हणून पनवेल महानगर पालिकेतर्फे शिष्यवृत्ती देवुन कौतुक केले व पुढील भविष्यात होणारे सायकलिंग स्पर्धेत पनवेलचे नावलौकिकात भर पाळावी म्हणून शुभेच्छा दिल्या स्नेहल हि खारघर पोलीस स्टेशन वरीष्ठ पोलिस निरीक्षक यांची कन्या आहे.

पनवेल महानगर पालिका आयुक्त सुधाकर देशमुख, उपायुक्त तृप्ती सांडभोर,उपायुक्त बंदला गुळवे, सभापती बालकल्याण मोनिका महानवर तसेच लोकनेते रामशेठ ठाकुर, आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकुर विरोधी पक्ष नेते प्रितेश म्हात्रे ह्यानी स्नेहल शत्रुघ्न माळीस पुढील भविष्यात होणारे स्पर्धेत पनवेल शहराचे नाव लौकिक वाढवावे म्हणुन शुभेच्छा दिल्या आहेत.



## रोहा धाटाव एमआयडीसी हद्दीतील नाल्यांच्या कामासाठी खोदलेले रस्ते नागरिकांच्या जीवावर

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

संपूर्ण जगभरात रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक क्षेत्राचे नाव आहे मात्र याच औद्योगिक क्षेत्रातील मान्सूचे तसेच क्षेत्रातील सांड पाणी वाहून जाणाऱ्या गटारांची कामे काही कोटी रुपयांची ईटेंडरिंग द्वारे ठेकेदाराने घेतली मागील दीड दोन वर्षांपासून अंतर्गत पाईपलाईन आणि सदरच्या गटारांच्या कामांची खोदाई ठेकेदाराने करून पाईपलाईन व गटारांच्या कामांना सुरवात केली मात्र काही कामे अर्धवट अवस्थेत असल्याने भर पावसात आता नागरिकांच्या जीवावर वेतत आपघाला निमंत्रण देणारी ठरत असल्याचे दिसून येत आहे.

सदर याविषयी सविस्तर माहिती अशी की रोहा धाटाव एमआयडीसी हद्दीतील नाल्यांच्या कामासाठी व पाईपलाईनसाठी खोदलेले रस्ते वेतलेत आता नागरिकांच्या जीवावर ,त्यामुळे आपघातांचा धोका वाढला असून काही ठिकाणी चक्क ठेकेदाराने मलमपट्टी लावून सोडली आहे गटार कामासठी व पाईपलाईन साठी काही ठिकाणी रस्ता खोदून त्या ठिकाणी पाईप गाडले तर काही ठिकाणी मोऱ्या बांधण्यात आल्या परंतु रस्ता खोदल्याने त्या दोन्ही बाजूस मोठं मोठे खड्डे झाले आहेत त्यावर संबधित ठेकेदाराने केवळ हागावर माती लकटावी अशी खडी पसरवून ठेवली तसेच खोदलेली माती पावसाळ्यात चिकट झाल्याने रस्त्यासभर पसरलयाने औद्योगिक क्षेत्रात कामावर येणारा बहुसंख्ये कामगारांना मोठा आपघातांचा धोका निर्माण झाला आहे कामावर येणारे कामगार हे तिन्ही सिफ्ट मध्ये येणारे असतात त्यात सुरू असलेला धो धो पाऊस यात ही चिकट झालेली माती त्यांच्या अपघाताला कारणीभूत ठरत मोठा अनर्थ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे कोलाड रोहा मार्गाला जोडला गेलेला दुसरा मार्ग सुदर्शन फाईनसॅक अंथया आरडीसी कडे जाणारा हा मार्ग आहे आणि त्या मार्गात खोदाई केलेल्या गटारांची कामे देखील दिरंगाई अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे. तरी संबधित अधिकारी वर्गाने याची गांभीर्याने दखल घेत या ठिकाणी आपघात टाळण्याकरिता उपाय योजना करावी अशी मागणी कामगार वर्गातून केली जात आहे.



## कार्यकाळ पूर्ण झालेल्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

शासकीय सेवेत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचा सेवाकाल हा ३ वर्षांचा ठरलेला आहे. परंतु उरणमधील शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्गांची कार्यकाल संपूनही आणखीन एक ते दोन वर्षे जास्त सेवा होऊनही त्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या नाहीत. तरी कार्यकाल संपूनही आजही उरणमध्ये कार्यरत असलेल्या शासकीय अधिकारी व कर्मचारी वर्गांच्या त्वरित बदली करण्याची मागणी सामाजिक संघटनांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे.

शासकीय सेवेत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांची एखाद्या ठिकाणी बदली झाल्यानंतर त्याठिकाणी ३ वर्षाचा कार्यकाल पूर्ण झाल्यानंतर बदली होणे बंधनकारक आहे. तशा प्रकारे काही अधिकारी व कर्मचारी वर्गांच्या बदल्या शासकीय नियमानुसार झाल्या आहेत. परंतु काही शासकीय खाते कुरण मिळणारे खाते असल्याने ते सहजासहजी सोडणे अधिकारी व कर्मचाऱ्यांना जड जात आहे. ते वरिष्ठांची मर्जी संपादन करून आपले आर्थिक हित साधून घेत आहेत. याबाबत अनेकवेळा संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यां विरोधात तक्रार करूनही वरिष्ठ त्यांची पाठराखण करतात. कोणी याबाबत माहिती मागितली किंवा एखादे भ्रष्टाचार प्रकरणाचे वृत्त प्रसिद्ध झाल्यावर संबंधित अधिकारी यात तथ्य नसून मोघम असून कोणाची नावे नसल्याचे सांगत वरिष्ठांची दिशाभूल करून आपला आर्थिक स्वार्थ साधून मोकळे होतात.

शासकीय सेवेत असणार्यां ना एखाद्या ठिकाणी ३ वर्षे सेवा करण्याचे बंधनकारक आहे. मात्र उरणमधील शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्ग यांची सेवाकाल पूर्ण होऊन ४ ते ५ वर्षे होऊनही ते त्याच पदावर आजही काम करीत आपल्या हाताखालच्या कर्मचार्यांकना त्रास देण्याचा प्रयत्न करीत असल्याची चर्चा कर्मचारी वर्गात दबक्या आवाजात सुरू आहे. तसेच माहितीच्या अधिकारात माहिती मागितली असता ती वेळेत न देता मोघम दिली जात आहे. यावरून येथील शासकीय अधिकारी कोणाला जुमानत नसल्याचे दिसते. वरिष्ठांकडे तक्रार केली तरी त्यांची संबंधित अधिकारी पाठराखण करीत असतात. अशा काही अधिकारी वर्गाच्या मालमत्तेची चौकशी केली तर नक्कीच त्यांचे आर्थिक घोटाळे उघडकीस येथील अशी चर्चा उरणच्या जनतेत सुरू आहे. उरणमधील शासकीय सेवेत असणार्यास अधिकारी व कर्मचारी वर्ग यांच्यापैकी ज्यांचा येथील सेवाकाल पूर्ण झाला असेल अशा अधिकारी व कर्मचारी वर्गांची त्वरित बदली करण्याची मागणी राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे उरणमधील सामाजिक संघटनांनी केली आहे.

## रेशनिंगचे गोदाम कोसळल्याने धान्य भिजले सुदैवाने जीवीतहानी टळली



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

बुधवार दि. ९ जुन रोजी पहाटे ४.०० वाजताचे सुमारास झालेल्या पावसामध्ये माणगांव येथील शेखर शंकर शेट यांच्या रेशनिंग दुकान नंबर २ व ३ च्या गोडाऊनची एका बाजुची भिंत संपुर्णपणे खाली कोसळुन, रेशनिंग दुकाना मधिल असलेल्या प्रत्येकी ५० किलो वजनाच्या भरलेल्या ५२ गोणी तांदुळ व ४८ गोणी गहु पाऊसाच्या पाण्यात भिजुन धान्याचे नुकसान झाले आहे. तसेच दुकानातील रेशनिंग रेकॉर्ड कागदपत्रे भिजली आहेत. सुदैवाने कोणतीही जीवीत हानी झाली नाही. गोदामाच्या एका बाजुची संपूर्ण भिंत कोसळुन, वरील छप्पर गोणींवर कोसळले, पाऊस असल्याने गोणी भिजल्या आहेत.

सकाळी सातचे सुमारास ही घटना लक्षात येताच सर्व शेट बंधुनी या ठिकाणी धाव घेत धान्य गोणी येथुन सुरक्षित ठिकाणी हलविण्यास सुरुवात केली परंतु मोठ्या संख्येने गोणी असल्याने पडणाऱ्या संततधार पाऊसात हे काम करणेस अडचण येत होती. या घटनेची माहीती मिळताच प्रस्तुत प्रतिनीधी यांनी तहसिलचे अधिकारी तसेच पोलीस व नगरपंचायत आपत्ती यंत्रणेसही संपर्क करुन ही माहीती कळविण्यात आली. त्यांनीही घटना स्थळी धाव घेतली. माणगांव तलाठी साळवे यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला आहे. या ठिकाणी माणगांवचे व्यापारी खेमचंद मेहता यांनी त्यांचे कडील हमाल माणस पाठवुन गोणी सुरक्षित बाहेर काढण्यास मोठी मदत केली त्यामुळे होणारे मोठे नुकसान टळले, असे मुकेश शंकर शेट यांनी प्रस्तुत प्रतिनिधी जवळ सांगितले आहे.

रास्तभाव दुकानदार संघटनेचे अध्यक्ष प्रमोद घोसाळकर यांनीही घटनास्थळी भेट दिली आहे. सतर्क शासनाच्या सुचना असुनही पहिल्याच पाऊसातील ही माणगांव मधिल पहीलीच दुर्घटना आहे. गोरगरीब जनते साठीचे रास्त भाव धान्य वाया गेले आहे.

## उरणमध्ये जोरदार पावसाच्या हजेरीने रस्त्यावर व सखल भागात पाणी ; अनेकांचे जनजीवन विस्कळीत



**दै.रायगड नगरी । उरण**

हवामान खात्याने मुंबई ठाणे, रायगडसह संपूर्ण कोकण विभागात ९ जून पासून ते १२ जून पर्यत अतिवृष्टीचा इशारा दिला आहे.उरण तालुक्यातही काल रात्री पासूनच जोरदार पर्जन्यवृष्टी सुरू झाली आहे.जेएनपीटी बंदर परिसरासह तालुक्यातील प्रमुख रस्त्यांवर व सखल भागात पावसाचे पाणी साचले आहे. त्यामुळे अनेकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. द्रोणागिरी डोंगरावरून येणाऱ्या पाण्याने चार फाटा रस्ता दिसेनासा झाला होता.त्यातच चाणजे ग्रामपंचायतने नाल्यांची सफाई न केल्यामुळे संपुर्ण एसटी स्टँड समोरील गटारे तुंबली होती.मात्र

चाणजे ग्रामपंचायतीने कोसळत्या पावसातच जेसीबी यंत्राच्या साहाय्याने गटारातील गाळ काढण्याचे काम हाती घेऊन पाण्याचा निचरा काढण्याचा मार्ग मोकळा केला.एकंदरीत मुसळधार पावसाबरोबर वादळ नसल्यामुळे कोणतीही वित्तहानी अथवा जीवित हानी पुरती टळली आहे.